# तुरीसोबत आंतरपिकांचे नियोजन

डॉ. आदिनाथ ताकटे, डॉ. सचिन सदाफळ

**कमी पाण्यात, कमी कालावधीत, कमी उत्पादन खर्चात तूर किंवा तूर + आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा. यामुळे जमिनीचे आरोग्य सुधारण्यास मदत होते.**

अवर्षणप्रवण भागातील कोरडवाहू क्षेत्रात बाजरी, सूर्यफूल, तूर, उडीद मूग, हुलगा, मटकी इत्यादी महत्त्वाची खरीप पिके आहेत. अति उथळ जमिनीवर हुलगा किंवा मटकी आणि उथळ जमिनीत बाजरी किंवा सूर्यफूल + तूर (२:१) ओळी या प्रमाणात आंतरपिकांची लागवड करावी. कमी पाण्यात, कमी कालावधीत, कमी उत्पादन खर्चात तूर किंवा तूर + आंतरपीक पद्धतीचा अवलंब केल्यास फायदेशीर ठरते. त्याच बरोबरीने जमिनीचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. पट्टा पद्धतीत तूर पेरणी केल्यानंतर जोड ओळीतील प्रत्येक तुरीच्या झाडास भरपूर सूर्यप्रकाश, मोकळी हवा मिळते. फुलांचे शेगांमध्ये रूपांतर करण्याची क्षमता वाढते. त्यामुळे उत्पादकतेत वाढ होते. तुरीच्या पिकातून जमिनीवर पडणाऱ्या पालापाचोळ्याचे सेंद्रिय खत होते. या खतामुळे जमिनीचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. एकरी अर्धा टन सेंद्रिय खत जमिनीत मिसळले जाते. तूर पिकामुळे पुढील पिकास एकरी ५० ते ८० किलो नत्र मिळते. तुरीच्या वाढीच्या काळात जमिनीवर पालापाचोळ्याचे आच्छादन तयार होते, त्यामुळे जमिनीतील ओलाव्यावर येणाऱ्या लव्हाळा व इतर तणांचे नियंत्रण होण्यास मदत होते.

छोट्या जाहिराती
व्यवसायवृद्धीचा मार्ग

क्लासिफाइड
सहा ओळींसाठी फक्त ५०० रूपये, पुढील प्रत्येक जादा ओळीस रु. ८५/-

विशेष योजना:
२ पेड + १ फ्री, ३ पेड + २ फ्री, ५ पेड + ५ फ्री, १०पेड + १२ फ्री

शेतीविषयक अन्य विषय

वनीकरण / वृक्षारोपण

वनीकरणासाठी लागणारी रोपे/ बियाणे मार्गदर्शन मोफत. महाराष्ट्र इतर राज्यात. ग्रामपंचायतीच्या गुण -वत्ता व अस्तित्व निर्माण करण्या बाबत, हरितमित्र परिवार. डॉ. महेंद्र घागरे : 9766000888.

व्यवसायविषयक

व्यवसाय धंदा

बी - बियाणे

बियाणे / रोपे विक्री

**तुरीचे सर्वोकृष्ट वान** राहुरीचे संशोधन दुर्मिळ असलेले फुले तृप्ती, फुले राजेश्वरी व सोयाबीन अमेरिकन सुपर फुले दुर्वा ९९२ बियाणे मिळेल. मो.९५६१६२३४९८.

**विविध जातीचे हळद** बियाणे विक्रीस उपलब्ध फक्त सहा महिन्यात येणारी हळदीची जात 1) ACC 48 प्रगती स्पाइस बोर्डा कडून उत्पादित आणी प्रसारीत जात 2) वायगाव-केवळ सात महिन्यात

जलसिंचन

बोअरवेल्स

**त्वरा करा!! त्वरा करा!! त्वरा करा!!** बोअरवेलचे पाणी वाढवणारे पेटंटेड तंत्रज्ञान फक्त ०८ हजार रुपयात. मराठवाड्यातील जिल्ह्यां साठी मर्यादित योजना. प्रथम नोंदणी करणाऱ्या ५०० शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात सेवा. संपर्क: 8956960567 / 8956960566.

eSakal.com

- पारंपरिक पद्धतीत तुरीच्या दोन ओळींतील अंतर दोन ते अडीच फूट ठेवतात. मात्र यामुळे फवारणीवेळी अडचणी येतात. तुरीच्या दोन ओळींत ९० सेंमी अंतर आणि १८० सेंमी. पट्टा आणि परत ९० सेंमी. अंतराच्या तुरीच्या जोडओळ लागवडीच्या प्रयोगातून उत्पादकता वाढविण्याबरोबरच आंतरपिकांचा लाभ मिळवता येतो. तुरीच्या दोन ओळींतील सरीमध्ये पावसाचे पाणी मुरेल. या ओलाव्याचा तुरीला लाभ होईल. तुरीची मुळे जमिनीत खोलवर जातात, त्यामुळे जमीन भुसभुशीत पोकळ होते.
- सोलापूर येथील कोरडवाहू शेती संशोधन केंद्रामध्ये अनेक वर्षांच्या प्रयोगातून फायदेशीर असणारी बाजरी+ तूर (२:१) किंवा सूर्यफूल+ तूर (२:१) या आंतरपीक पद्धतीमुळे अनुक्रमे ७० आणि ८४ टक्के उत्पादनात वाढ झाली आहे.
- भिन्न कालावधी, भिन्न मूळ रचना असणारी पिके निवडली तर ती एकमेकांबरोबर स्पर्धा न करता पूरक ठरतात. उदा. बाजरी + तूर (२:१) किंवा सूर्यफूल + तूर ( २:१ ) आंतरपिकातील बाजरी व सूर्यफुलाचा कालावधी ८० ते ९० दिवसांचा असतो. तर तुरीच्या जातीनुसार हा कालावधी १२५ ते १६० दिवसांचा असतो.
- बाजरी किंवा सूर्यफूल काढल्यानंतर राहिलेल्या कालावधीतील पाऊस, सूर्यप्रकाश, जमिनीतील ओलावा, अन्नद्रव्ये आणि जागेचा तुरीच्या वाढीस उपयोग होतो.
- बाजरी/सूर्यफुलाची मुळे तंतुमय असल्यामुळे जमिनीच्या वरच्या थरातील ओलावा,अन्नद्रव्यांचे शोषण होते. तुरीचे सोटमूळ असल्यामुळे जमिनीतील खालच्या थरातील अन्नद्रव्ये आणि ओलाव्याचे शोषण होते. त्यामुळे ती एकमेकांस पूरक ठरतात. तुरीच्या मुळावरील गाठीत रायझोबियम जिवाणू असतात. ते हवेतील नत्र शोषून जमिनीत गाडतात आणि पुढील पिकास उपलब्ध करून देतात, जमिनीची सुपीकता वाढते. तूर तयार होतेवेळी निम्मा पाला जमिनीवर पडतो. त्यामुळे जमिनीत सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढून पोत सुधारतो. द्विदल पिकांचा समावेश आंतरपीक पद्धतीत केल्यास जमिनीची सुपीकता व पोत टिकून राहते.
- आंतरपिकांसाठी तुरीच्या मध्यम मुदतीच्या जाती असाव्यात. अलीकडच्या काळात तूर + सोयाबीन (१:३ किंवा १:४) पद्धतीने पेरल्यास दोन्ही पिकांचे चांगले उत्पादन येते. सोयाबीनच्या ओळीमध्ये ३० सेंमी आणि दोन रोपांमध्ये १० सेंमी अंतर ठेवावे. सोयाबीनच्या तीन ओळींनंतर तुरीची एक ओळ पेरावी. तुरीच्या दोन ओळींतील अंतर १२० सेंमी येते. तुरीच्या दोन रोपांतील अंतर २० सेंमी ठेवावे. प्रति हेक्टरी ६० ते ६५ किलो सोयाबीन आणि ५ किलो तुरीचे बियाणे पुरेसे होते.



सूर्यफूल आणि तूर (२ :१ ) आंतरपीक पद्धती

**अवर्षण क्षेत्रात आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची आंतरपिके**

| पाऊस आगमन | आंतरपिके |
|---|---|
| जुलै पहिला आठवडा | बाजरी + तूर (२:१), सूर्यफूल+ तूर (२:१), गवार+ तूर (२:१), गवार + एरंडी (२;१) |
| जुलै दुसरा आठवडा | सूर्यफूल+ तूर (२:१ ), गवार+ तूर (२:१ ) |
| ऑगस्ट पहिला आठवडा | सूर्यफूल+ तूर (२:१), एरंडी+ दोडका (मिश्र पीक), सूर्यफूल+ तूर (२:१) |

- आंतरपीक पद्धतीमुळे कोणत्याही पिकाचे क्षेत्र कमी न होता नवीन पिकाखाली अधिक क्षेत्र आणता येते. आंतरपीक पद्धतीत दोन पिके असली तरी मुख्य एका पिकासाठी खत देण्याची शिफारस असल्याने दिलेले खत दोन्ही पिकांस उपयुक्त ठरते.
- बाजरी + तूर किंवा सूर्यफूल + तूर या आंतरपीक पद्धतीत बाजरी/ सूर्यफूल काढल्यानंतर मशागत करणे महत्त्वाचे असते. कारण मुख्य पीक निघाल्यानंतर, दुसऱ्या पिकांकरिता ओल टिकवून ठेवणे गरजेचे आहे. त्याकरिता पीक काढल्याबरोबर कुळव चालवून तण व धसकटे उपटून काढून तेथेच वाळू द्यावीत.

## आंतरपीक पद्धतीचे फायदे

- वर्षात दोन/ तीन पिके घेता येतात.
- जमिनीस कमी मशागत लागते.
- जमिनीतील ओलावा, अन्नद्रव्ये आणि जागा यांचा योग्य उपयोग होतो.
- जमिनीची सुपीकता सुधारते. हेक्टरी अधिक उत्पादन मिळते.
- विपरीत व प्रतिकूल हंगामात एखादे तरी पीक हाती येते.
- एकूण मशागत खर्च कमी हेक्टरी नफ्याचे प्रमाण अधिक वाढते.

- डॉ. आदिनाथ ताकटे, ९४०४०३२३८९,
(एकात्मिक शेती पद्धती संशोधन प्रकल्प,
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. नगर)